# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक


संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/९१२ दिनांक : ११/०६/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय** : विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणांतर्गत जिल्हा समन्वयक पदाकरिता इच्छुकांची माहिती पाठवण्याबाबत.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठामध्ये जी प्राधिकरणे अस्तित्वात आली आहेत त्यापैकी कलम २६ नुसार विद्यार्थी विकास मंडळ हे एक प्राधिकरण आहे. विद्यार्थी विकास मंडळ या प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये नव्या कायद्यात ५६ (१) नुसार नमूद केली आहेत. विद्यार्थी विकास मंडळाद्वारे महाविद्यालये, परिसंस्था व विद्यापीठ विभागांमधील विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक व कल्याणकारी कार्यक्रमांची आखणी आणि त्यांचे अन्वेक्षण करून विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या बाबतीत प्रादेशिक व राष्ट्रीय मंडळांशी दुवा साधणे, तसेच कमवा व शिका योजना, शैक्षणिक कर्ज, कुलगुरू साहाय्य निधी, विद्यार्थी आदान–प्रदान योजना यासारख्या विद्यार्थी विकासाच्या योजना तयार करणे, विद्यापीठस्तरीय स्पर्धा, कौशल्य विकास कार्यशाळा याबरोबरच प्रायोगिक कला व ललित कला क्षेत्राचे आकलन होण्यासाठी उपक्रम राबविणे, विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी जीवनातील तक्रारी दूर करणे व विद्यार्थ्यांसाठी लैगिंक छळ व रॅगिंग प्रतिबंध यंत्रणा उभारणे या आणि अशा प्रकारच्या विद्यार्थी विकासाच्या रचनात्मक योजना व उपाययोजना राबवण्याबाबत निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५५ (२)(छ) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेने प्रत्येक जिल्हासाठी सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण कार्यक्रमांचे जिल्हासमन्वयक नामनिर्देशन करणे गरजेचे आहे. त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित पुणे, अहमदनगर व नाशिक अशा तीन जिल्हयांच्या कामाकाजात सुसूत्रीकरण्याच्यादृष्टीने पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर व नाशिक अशा चार विभागात जिल्हा समन्वयकाची मा. कुलगुरू यांच्याकडून नामनिर्देशन करण्यात येणार आहे.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील जिल्हा समन्वयक पदाकरिता इच्छुक विद्यार्थी विकास मंडळाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती असणारा आणि विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून किमान ३ वर्षांचा अनुभव असणाऱ्या विद्यापीठ मान्यताप्राप्त पूर्णवेळ शिक्षकाची विस्तृत माहिती आपल्यामार्फत **bsd@unipune.ac.in या मेलवर किंवा स्वहस्ते विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयाकडे दिनांक १३ जून, २०१८** पर्यंत पाठविण्यात यावी. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ